(447)

क्र : मुंमप्रविप्रा/बैठक/४०.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

दिनांक : 30 एप्रिल, १९८८.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ मार्च, १९८८ रोजी झालेल्या चाळीसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्री. वि. आसगांवकर
30/4/88

( श्र.वि.आसगांवकर )
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

सर्व सदस्य,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

---

No.BMRDA/MTG/40.

BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan, 5th Floor,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 30th April, 1986.

The minutes of the 40th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 27th March, 1986 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

S. Asgaonkar 30/4/86
(S. V. ASGAONKAR)
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE.

To:

✓ All Members. Metropolitan Commissioner. B.M.R.D.A.

The Officers of the B.M.R.D.A.

-.-.-.-.-.-.-

ukd:

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चाळीसाव्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २७ मार्च, १९८६ (गुरुवार)

वेळ : दुपारी १२.०० वाजता

सभास्थान : समिती-कक्ष, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| डॉ. व्ही. सुब्रह्मण्यन्<br>नगर विकास व गृहनिर्माण मंत्री | -- | अध्यक्ष |
| श्री. विलास विष्णु सावंत<br>नगर विकास राज्यमंत्री | -- | सदस्य |
| श्री. छगन भुजबळ<br>मुंबईचे महापौर | -- | सदस्य |
| श्री. रमणलाल छोटालाल अंकलेश्वरिया<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्रीमती इंदुमती गि. पटेल<br>नगरसेविका, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्या |
| श्री. भगवंतराव अण्णासाहेब पाटील<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. रमेश दुबे,<br>विधान सभा सदस्य | -- | सदस्य |
| श्री. चंद्रशेखर प्रभू<br>विधान सभा सदस्य | -- | सदस्य |
| श्री. पांडुरंग शिवराम देशमुख<br>विधान परिषद सदस्य | -- | सदस्य |
| श्री. जे. जी. कांगा<br>महापालिका आयुक्त,<br>मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. दिनेशकुमार जैन<br>शासनाचे सचिव,<br>नगर विकास विभाग | -- | सदस्य |
| श्री. दिनेश अफझुलपुरकर<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | -- | सदस्य |
| श्री. ल. चं. गुप्ता<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको, मुंबई. | -- | सदस्य |
| श्री. एस. आर. काकोडकर<br>महानगर आयुक्त | -- | सदस्य-सचिव |

...२/-

बाब क्र.१ : मागील (३९व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे

उपरोक्त विषयावर झालेल्या चर्चेत सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यानी कार्यवृत्तातील बाब क्र.९चा उल्लेख करून ट्रक टर्मिनल कार्यान्वित झाल्यानंतर मालवाहतूक कंपन्या आदी दक्षिण मुंबईतील त्यांच्या विद्यमान जागांवरुन सुध्दा व्यवहार चालू ठेवणार नाहीत याची खातरजमा होण्यासाठी कडक उपाय योजना केली जावी अशी सूचना केली.या बाबतीत एखादी कार्यान्वयी यंत्रणा असण्याच्या गरजेवरही त्यानी भर दिला.

१.२ महानगर आयुक्त यानी या बाबतीत असे स्पष्टीकरण केले की, ट्रक टर्मिनल कार्यान्वित झाल्यानंतर, मालवाहतूक कंपन्या आदी दक्षिण मुंबईतील त्यांच्या विद्यमान जागांवरुन सुध्दा व्यवहार चालू ठेवणार नाहीत याची खातरजमा बाळगण्याच्या गरजेसकट सर्व संभाव्य गोष्टी विचारात घेऊन मु.म.प्र.वि.प्राधिकरणाने यापूर्वीच एक विधिविधान तयार केले आहे.प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील कार्यकारी समितीने दिनांक २८ मे, १९८५ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रारुप विधिविधानावर योग्य तो विचारविमर्श केलेला आहे. सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग हे कार्यकारी समितीचेही सदस्य आहेत.त्यानंतर सदर प्रारुप विधिविधान, अंतिमकरण व मान्यतेसाठी विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आले आहे.प्राधिकरण आणि विधी व न्याय विभाग यांच्यात प्रारुप विधेयकावर चर्चा झालेली असून विधी सचिवांकडून कोणत्याही क्षणी त्याला अंतिम मान्यता अपेक्षित आहे.

१.३ उपरोक्त विषयावर अधिक चर्चा होऊन सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग याना, त्यांच्या काही सूचना असल्यास त्या जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रारुप विधेयक दाखविण्यात यावे आणि विधी सचिवांची मान्यता लाभल्यानंतर ते प्रारुप विधेयक प्राधिकरणासमोर विचारविमर्शासाठी ठेवण्यात यावे असे ठरले.

१.४ नंतर बैठकीचे कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र.२ : मागील (३९व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही

कार्यवाही अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'इ' ब्लॉकमधील क्र.सी-१८ ते सी-२२ या वाणिज्य भू-खंडाचे नियत वाटप

३.१ या बाब-टिप्पणीवर प्रदीर्घ-चर्चा झाली.चर्चेत अनेक सूचना व कल्पना मांडण्यात येऊन त्यांवर सविस्तर विचारविमर्श झाला.

३.२ सुरुवातीस, महानगर आयुक्तांनी सांगितले की, सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उपक्रम, बँका आदींनी वांद्रे-कुर्ला समूहातील भू-खंडासाठी मागणी नोंदविलेली असली तरी त्यांना, संघटनांना भू-खंडाचा देकार दिला गेल्यास तो खरेदी करण्याची त्यांची आर्थिक क्षमता आहे का ? ही बाजूही विचारात घेणे आवश्यक ठरते. याचे कारण गतकाळात काही संघटना त्याना देऊ केलेले भू-खंड आर्थिक अडचणी आदींमुळे खरेदी करु शकल्या नाहीत.या गोष्टीकडे महानगर आयुक्तांनी लक्ष वेधले.

३.३ भू-खंडाचा अधिमूल्याचा प्रस्तावित दर प्रती चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.४५५०/-इतका असण्यासंदर्भात महानगर आयुक्तानी असे स्पष्टीकरण केले की,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकासप्राधिकरणाने८महिन्यापूर्वी वांद्रे-कुर्ला समूहातील अशाच एका भूखंडाची जाहीर लिलावाने विक्री केली असता जी सर्वाधिक बोली प्राप्त झाली त्या बोलीवर हा अधिमूल्य दर आधारित आहे.

३.४ बाब-टिप्पणीवर झालेल्या चर्चेच्या ओघात, भू-खंडाची प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.४५५०/-या अधिमूल्य दराने विक्री करण्याऐवजी जाहीर लिलावाने त्याची विक्री व्हावी अशी सूचना करण्यात आली.या सूचनेला अनुकूल मत दिसून आले नाही.अशा पध्दतीमुळे भू-खंडासाठी मागणी नोंदविणारे शासनाचे विभाग आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम हे जाहीर लिलावात भाग घेण्यास बहुधा पुढे येणार नाहीत आणि त्यामुळे वांद्रे-कुर्ला समूहात भू-खंड मिळावेत ही त्यांची मागणी पुरी होऊ शकणार नाही अशी भीति व्यक्त करण्यात आली.अशा स्थितीत सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना नियत मूल्याने भू-खंड देऊ करणेच उचित ठरेल असे मत याबाबतीत व्यक्त करण्यात आले.

३.५ दक्षिण मुंबईतील विविध व्यवहारातून निर्माण झालेली गर्दीसदृश्य स्थिती विरळ करणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे एकूण उद्दीष्ट असल्याने वांद्रे-कुर्ला समूहातील भू-खंडाचे नियत वाटप करतेवेळी या उद्दीष्टाचे भान राखले जावे असे विचार काही सदस्यानी व्यक्त केले.ज्या संघटनांची मुंबई शहराच्या बेट भागातून आपली कार्यालये बाहेर हलविण्याची इच्छा आहे,अशांना भू-खंडाचे नियत वाटपात प्राधान्य दिले जावे अशी सूचना या संदर्भात करण्यात आली.वांद्रे-कुर्ला समूहाचे पर्यायी विकास केंद्र म्हणून विकसन करण्यामागील मुख्य उद्देश कार्यालये, निवासी व व्यापारी उलाढाली सामावून घेण्यासाठी मुळी मुंबई शहराच्या बेट भागाबाहेर एक पर्यायी पूर्वसंरचनात्मक सुविधा निर्माण करणे हा आहे, असे महानगर आयुक्तानी सांगितले.वांद्रे-कुर्ला समूहात व्यापक स्वरुपात पर्यायी कार्यालयीन जागा निर्माण केल्याने या शहराच्या बेट भागात अतिरिक्त कार्यालयीन जागा उपलब्ध करण्यावर पडणारा वाढता ताण आपोआपच कमी होईल व तद्नुरुप शहराच्या बेट भागात आणखी गर्दी वाढण्यास पायबंद बसेल.ज्या संघटनानी वांद्रे-कुर्ला समूहातील भू-खंडासाठी मागणी नोंदविली आहे.त्या संघटना, वांद्रे-कुर्ला समूहातील त्यांची कार्यालये स्थापन झाल्यानंतर, वस्तुतः काही प्रमाणात रोजगार त्या ठिकाणी वळविणार आहेत.या संघटनांपैकी ब-याच संघटनांची दक्षिण मुंबईतील विद्यमान कार्यालये/जागा सध्या अतिशय दाट वस्तीत आहेत व त्याना वांद्रे-कुर्ला समूहात पर्यायी जागा दिली गेल्यास त्या संघटना आपल्या कर्मचारी वर्गापैकी काही कर्मचारी वांद्रे-कुर्ला समूहात पाठवू शकतील. त्यामुळे दक्षिण मुंबईतील गर्दी काही अंशी कमी होऊ शकेल.जरी या संघटनांना वांद्रे-कुर्ला समूहात कार्यालयीन भू-खंड उपलब्ध करुन देण्यात आले तरी त्यानी दक्षिण मुंबईतील आपली सध्याची कार्यालये सरसकट हलवावीत अशी अपेक्षा करणे अवास्तव ठरेल, असे मत काही सदस्यानी व्यक्त केले.

३.६ या बाब-टिप्पणीवर अधिक चर्चा होऊन वांद्रे-कुर्ला समूहात वाणिज्य भू-खंडासाठी ज्या संघटनानी मागणी नोंदविली आहे त्यांच्याकडून पुढील मुद्यावर माहिती संकलित केली जावी आणि प्रस्तुत बाब-टिप्पणीवर सर्वंकष विचारविमर्श करून निर्णय घेणे शक्य व्हावे म्हणून ती माहिती प्राधिकरणापुढे ठेवली जावी असा निर्णय घेण्यात आला :-

(१) अर्जदार संघटनेची दक्षिण मुंबईत असलेल्या विद्यमान कार्यालयीन जागेचे एकूण क्षेत्रफळ

(२) दक्षिण मुंबईतील विद्यमान कार्यालयीन जागेचे ठिकाण (पत्ता)

(३) या कार्यालयीन जागामध्ये काम करणा-या कर्मचा-यांची एकूण संख्या

(४) अर्जदार संघटनेचे वांद्रे-कुर्ला समूहातील वाणिज्य भू-खंड मागण्याचे प्रयोजन, म्हणजे :

(अ) विद्यमान व्यवहाराच्या/कर्मचारीवर्गाच्या विस्तारासाठी आहे का ?

किंवा

(ब) दक्षिण मुंबईतील अर्जदाराच्या विद्यमान जागातून वांद्रे-कुर्ला समूहातील संकल्पित नवीन जागेकडे व्यवहाराची/विभागाची/कर्मचा-यांची पुनःपावरण ( करण्यासाठी सदर भू-खंड हवा का ?

(स्थलांतरित करावयाच्या कर्मचा-यांची संख्या तपशीलवार पुरविणे.)

(क) दक्षिण मुंबईतील अर्जदाराच्या एकूण व्यवहाराचे कर्मचा-या-सकट स्थलांतर करण्यासाठी सदर भू-खंड हवा का ?

(ड) जर (ब) अथवा (क) मधील निवेदन बरोबर आहे तर रिक्त जागांचा अंशतः पूर्णतया कशासाठी वापर केला जाईल ?

३.७ वांद्रे-कुर्ला समूहातील भू-खंडाचे अंतिमतः ज्या संघटनेला नियत वाटप केले जाईल त्या संघटनेने, सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडे-दराने एकूण परिबध्द जागेपैकी एक-दशांश क्षेत्रफळाची जागा राज्य शासनाला उपलब्ध करण्याची तयारी दर्शविल्यास अशा संघटनेला थोडा कमी अधिमूल्य दर उध्दृत करण्याचा विकल्प देण्यात यावा का, या प्रश्नावरही प्राधिकरणाने विचारविमर्श केला. संघटनेची स्वतःची गरज भागून शिवाय जादा परिबध्द जागा शिल्लक राहिली तरच संघटनेला एक-दशांश परिबध्द जागा प्रत्यर्पित करण्यास सांगण्यात यावे असे मत त्यावर व्यक्त झाले. त्या दृष्टीने उचित अशी अट मुं.म.प्र.वि.प्राधिकरण आणि लाभधारक संघटना यांच्यात निष्पादित केल्या जाणा-या भाडे-करारनाम्यात समाविष्ट करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

३.८ उपरोक्त ३.६ परिच्छेदात उल्लेखिम माहिती दिली जाईतोवर प्रस्तुत बाब-टिप्पणीवर निर्णय घेण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

<u>बाब क्र.४ :</u> <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ट्रक टर्मिनल स्थावर संपत्ती (घटना, शक्ती व कार्ये) विनियम १९८६ मध्ये दुरुस्ती</u>

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३०० :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ९ चे उपकलम (१) व त्यासोबत कलम ५० या अन्वये निहित असलेल्या आणि त्या संदर्भात सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व शक्तींचा अवलंब करून हे प्राधिकरण, त्याने दिनांक २.१.१९८८ च्या ठराव क्र.२९३ अन्वये मान्यता दिलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ट्रक टर्मिनल स्थावर संपत्ती समिती (घटना, शक्ती व कार्ये) विनियम १९८८ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करीत आहे :

'मुं.म.प्र.वि.प्राधिकरण ट्रक टर्मिनल स्थावर संपत्ती समिती (घटना, शक्ती व कार्ये) विनियम १९८८ च्या विनियम ५ मध्ये अशी शब्द योजना तेथे राहील या मजकूरानंतर पुढील मजकूराची जोड देण्यात यावी :

'उपबंधित करण्यात येते की मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (जमीन विक्री) विनियम १९७७ च्या विनियम ९ चे खंड (१) व (३) येथे लागू होणार नाहीत आणि ते वगळण्यात येतील आणि अधिमूल्याचा भरणा करण्यासंबंधीच्या अटी निश्चित करण्याचा कायदेशीर हक्क समितीला राहील आणि त्यापुढे असेही उपबंधित करण्यात येते की उक्त विनियमांमध्ये जेथे 'प्राधिकरण' असा उल्लेख आलेला आहे त्याऐवजी 'समिती' अशी शब्दयोजना करण्यात यावी.' "

बाब क्र.५ : १९८६-८७ सालाचा वार्षिक कार्ये-कार्यक्रम

५.१ प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला. राज्य शासनाकडून प्राधिकरणाला रु.४ कोटी इतके अनुदान मिळेल असे गृहित धरण्यात आले होते. परंतु मागाहून शासनाने कळविल्याप्रमाणे सदर अनुदान फक्त रु.३.५० कोटी इतकेच रहाणार आहे. या घटनेची प्राधिकरणाने नोंद घेतली म्हणून (१९८६-८७ सालच्या वार्षिक कार्ये-कार्यक्रमातील पृष्ठ क्र.३५ व ३५अ वर उल्लेखित 'माहीम खाडीत जलमार्ग खोदाई') कार्य क्र.७.६ साठी प्रस्तावित केलेला रु.१ कोटी हा खर्च कमी करून तो रु.५० लाख इतका निश्चित करण्यास प्राधिकरणाने संमती दिली.

५.२ या बाबीवर झालेल्या चर्चेत मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १८(१)(अ) खाली राज्य शासनाकडून प्राधिकरणाला प्रतिसाल रु.५/-कोटीहून कमी नाही इतके अंशदान मिळण्याची कायदेशीर तरतूद आहे. परंतु शासनाने मागील ११ वर्षात प्रत्यक्षात रु.११.५ कोटी इतकेच अंशदान दिले आहे असा विचार व्यक्त झाला. प्राप्त अंशदानापैकी रु.४ कोटी कळवा-तुर्भे कडरुळ रेल्वे फाटयाच्या बांधकामासाठी सिडकोला अदा करण्याकरिता वळविण्यात आले. मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या संबंद्ध तरतुदीखाली देय असलेली पर्याप्त अनुदाने प्राधिकरणाला त्याची भूमिका प्रभावीपणे पार पाडता यावी म्हणून प्रदान करणे भाग होते असे बैठकीत ठामपणे मतप्रदर्शन करण्यात आले.

५.३ त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र•३०१ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, [अ] या टिप्पणीसह सादर केलेल्या १९८६–८७ सालच्या वार्षिक कार्य कार्यक्रमास ,"माहीम खाडीत जलमार्ग खोदाई" या कार्य क्र•७•६ साठी प्रस्तावित केलेला रू•१ कोटी हा खर्च घटीत करून तो रू•५० लाख इतका निश्चित करण्याच्या दृष्टीने आवश्यक तो फेरफार घडविण्यास सापेक्ष मंजूरी देण्यात येत आहे आणि [ब] वार्षिक कार्य-कार्यक्रमात अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशीलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे•"

बाब क्र•६ : १९८६–८७ सालाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र•३०२ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, १९८६–८७ सालचा वार्षिक अर्थसंकल्प आणि १९८५–८६ सालचे सुधारीत अंदाज यांतील महानगर प्राधिकरणाच्या जमा आणि व्यय रकमा त्यामध्ये पुढील फेरफार करण्यात येतील या गृहीतकाच्या अधीन राहून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम, १९७४ चे कलम २३[१] खाली मंजूर करण्यात येत आहेत :-

'१९८६–८७ सालाच्या जमा रकमांच्या बाजूने राज्य शासनाकडून मिळणा-या सांविधिक अंशदानाची तरतूद [रू•४/- कोटी ऐवजी] रू•३•५० कोटी इतकी दाखविण्यात यावी आणि तदनुसार, एकूण जमा रकमा [रू•१,८२७,९९ लाखां ऐवजी] रू•१,७७७.९९ लाख इतक्या दाखविण्यात याव्यात आणि परिणामत: विकास कार्यावरील खर्च [रू•११०८•०० लाखांऐवजी] रू•१०५८•०० लाख इतका दाखविण्यात यावा आणि एकूण खर्च [रू•१.८२७•९९ लाखांऐवजी] रू•१,७७७•९९ लाख इतका दाखविण्यात यावा• तसेच बाब क्र•५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्य क्र•६ खाली प्रस्तावित खर्चात आवश्यक ती घट केली जावी•'

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, अधिनियमाचे कलम १८[१][अ] अन्वये राज्य शासनाकडून योजना अनुदानाबाबतीत प्रत्यक्ष जेवढी अनुदान रक्कम या प्राधिकरणाला मंजूर करण्यात येईल तेवढी रक्कम शासनाच्या

449
451

मान्यतेप्रमाणे नमूद करण्यात आलेल्या शर्तीप्रमाणे त्या योजनांवर खर्च करण्यास हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे कार्यकारी समितीला योजना, सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम-अहवालामध्ये समाविष्ट नसलेल्या आणि प्रत्येकी अंदाजे रु.१० लाखांपेक्षा अधिक व्यय नसलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा आणि या मर्यादेपेक्षा अधिक नसलेला व मंजूर अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार, अशा प्रकरणांचे प्रतिवेदन प्राधिकरणाला त्याच्या आगामी बैठकीत सादर करण्याच्या अटीवर देत आहे."

बाब क्र.७ : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खाली कल्याणच्या विकास आराखडयात आरक्षण क्र.६२ च्या बाबतीत किरकोळ फेरफार

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३०३ :

"ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४०[१][क] च्या तरतुदीखाली शासन निर्णय क्र.टीपीबी-१२७५-११९१/नवि-८ दिनांक १५ मार्च, १९७६ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी एक विशेष नियोजन म्हणून नियुक्ती झाली आहे व त्याअर्थी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ११३[८] खालील तरतुदीनुसार नियोजन प्राधिकरणाची कार्ये पार पाडणे बंधनकारक आहे.

"आणि ज्याअर्थी भूतपूर्व कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ नगरपालिकेचे क्षेत्र आणि उल्हासनगर नगरपरिषदेची हद्द विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारितेत समाविष्ट आहे;

"आणि ज्याअर्थी कल्याण महानगरपालिकेने जागा क्र.६२ च्या आरक्षणामध्ये "क्रीडांगण" ऐवजी "शाळा व क्रीडांगण" असा आणि त्याच जागेच्या संपादन व विकसनासाठीचा योग्य प्राधिकारी म्हणून "कल्याण नगर परिषद" ऐवजी "शिशु विकास संस्था, कल्याण" असा फेरफार घडविण्याची मुंबई महानगर प्रदेश

....८/-

विकास प्राधिकरणाला विनंती केली आहे;

"आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ खाली कल्याणच्या अनुज्ञेय विकास आराखडयात जागा क्र.६२ च्या बाबतीत फेरफार घडविण्यासाठी कृती करण्याचा निर्देश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला दिला आहे;

"आता म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ११३[८] मध्ये उल्लेखित शक्तीचा अवलंब करुन हे महानगर प्राधिकरण [बी.एम.आर.डी.ए.] कल्याणच्या अनुज्ञेय विकास आराखडयातील जागा क्र.६२ बाबतीत उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये सूचित केल्याप्रमाणे कृती करण्याचा ठराव याद्वारे मंजूर करीत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खालील शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व शक्तींचा अवलंब करुन हे महानगर प्राधिकरण अशा फेरफारास अनुलक्षून महाराष्ट्र शासन राजपत्रात आणि दोनहून कमी नाही इतक्या स्थानिक वृत्तपत्रांतून एक नोटीस प्रकाशित करण्यास आणि अशी नोटीस प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याहून उशीरा नाही इतक्या अवधीत फेरफारास अनुलक्षून जनतेकडून हरकती व सूचना मागविण्याच्या इरादाने ही नोटीस प्रकाशित करण्यास आपली मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण उक्त अधिनियमाचे कलम १३९ खालील प्रयोज्य शक्ती-सोबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम १९७४ चे कलम ७[अ] वाचावे--यांचा वापर करुन पूर्वगामी खंडाशी सुसंगत अशा प्रकारे ती नोटीस प्रकाशित करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १५१ [३] खालील प्रयोज्य शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण असा निदेश देत आहे की, महानगर आयुक्तांनी त्या संदर्भात हरकती/सूचना सादर करणा-या व्यक्तींची बाजू ऐकून त्या हरकती/सूचना विचारात घ्याव्यात आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मधील तरतुदींना धरुन त्यानी आपले प्रतिवेदन प्रस्तावित फेरफारांसह अंतिम

....९/-

मंजूरीसाठी शासनाला सादर करावे."

बाब क्र.८ : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खाली कल्याण महानगरपालिका व उल्हासनगर नगरपरिषद क्षेत्रासाठी प्रमाणीकृत बांधकाम विनियम आणि विकास नियंत्रण नियत स्वीकृत करण्याबाबत

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३०४ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४०[१][३] व कलम ११३[८] - सोबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम, १९७४ चे कलम १२[३] वाचावे- या खालील शक्ती आणि त्याबाबतीत शक्ती प्रदान करणा-या इतर सर्व सहाय्यभूत शक्ती विचारात घेऊन राज्य शासनाने दिनांक १६ जुलै, १९८० च्या आपल्या निर्णयान्वये महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू करण्यास मान्यता दिलेले आणि स्थानिक क्षेत्रास योग्य ठरावेत म्हणून फेरफारीत केलेले प्रमाणीकृत बांधकाम विनियम आणि विकास नियंत्रण नियम हे भूतपूर्व कल्याण, डोंबिवली व अंबरनाथ नगरपरिषदेच्या अधिकारितेखालील क्षेत्रासकट समग्र कल्याण समूह अधिसूचित क्षेत्र आणि उल्हासनगर नगरपरिषदेच्या अधिकारितेखालील क्षेत्र यांना लागू केले जावेत;

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, नियम/विनियमांच्या नव्या संचाला याद्वारे मान्यता देण्यात येत आहे आणि शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ खाली निदेशित केल्याप्रमाणे नवीन संच तात्काळ लागू होईल;

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ खाली आवश्यकतेनुरूप महानगर आयुक्तांना विषयानुलक्षाने आवश्यक ती पुढील कृती करण्यास याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.९ : प्रकल्प अधिकारी [बाजारपेठा] हे पद पुढे चालू ठेवण्याबाबत

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३०५ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत प्रस्तावित

....१०/-

केल्याप्रमाणे, प्रकल्प अधिकारी [बाजारपेठा] या रु.१०००-५०-१७५० अधिक नेहमीचे भत्ते ह्या वेतनश्रेणीतील पदाचा सध्याचा कालावधी आणखी २ वर्षांनी म्हणजे दिनांक ३१ मार्च, १९८८ पर्यंत वाढविण्यास प्राधिकरण याद्वारे आपली मान्यता देत आहे."

बाब क्र.१० : प्राधिकरणाच्या सेवेत प्रशिक्षार्थींची ४ पदे निर्माण करणे

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३०६ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे हे प्राधिकरण मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ११[२] खालील निहित शक्तींचा अवलंब करुन प्राधिकरणाच्या "प्रशासन विभाग" आणि "वित्त व लेखा विभाग" यामध्ये प्रशिक्षार्थींची प्रत्येकी दोन मिळून एकूण ४ पदे निर्माण करण्यास आणि त्या पदांसाठी शासन वेळोवेळी निश्चित करील त्या दराने त्यांचे वृत्तिवेतन निश्चित करण्यास आपली मान्यता देत आहे."

बाब क्र.११ : धुलाई भत्त्याच्या दरात सुधारणा

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्यात चपराशी, पहारेकरी व वाहनचालक यांच्यासाठी सूचित करण्यात आलेला गणवेष धुलाई भत्ता रु.१५/- ऐवजी सुधारीत दर प्रतिमास रु.२०/- इतका वाढविण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३०७ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या सेवेतील चपराशी, पहारेकरी व वाहनचालक याना सध्या दिला जात असलेला धुलाईभत्ता १९८६-८७ या वित्तीय वर्षापासून प्रतिमास प्रत्येकी रु.२०/- या समाईक दराने अदा करण्यास हे प्राधिकरण आपली मान्यता देत आहे."

बाब क्र.१२ : [अ] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने नियोजन कार्य केलेल्या कल्याण समूह अधिसूचित क्षेत्राचा १९८४-८५ सालाचा वार्षिक कार्य-अहवाल

[ब] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने नियोजन कार्य केलेल्या वांद्रे-कुर्ला समूह अधिसूचित क्षेत्राचा १९८४-८५ सालाचा वार्षिक कार्य-अहवाल

...११/-

[क] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने नियोजन कार्य केलेल्या बॅक-बे रिक्लेमेशन क्षेत्राचा १९८३-८४ व १९८४-८५ या वर्षाचा विशेष कार्य अहवाल

[ड] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने नियोजन कार्य केलेल्या ओशिवरे जिल्हा केंद्राचा पुढील कालावधीचा कार्य-अहवाल

[१] दि•१८-६-१९८२ ते दिनांक ३१-३-१९८३

[२] दि•१-४-१९८३ ते दिनांक ३१-३-१९८४ व

(३) दिनांक १-४-१९८४ ते दिनांक ३१-३-१९८५

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, वर उल्लेखित विविध अधिसूचित क्षेत्रांचा विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने तयार केलेले वार्षिक कार्य-अहवालावर विचारविमर्श केला आणि त्यास अनुलक्षून पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र•३०८ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १३३ खाली आवश्यक असल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने तयार केलेला [अ] कल्याण समूह अधिसूचित क्षेत्राचा १९८४-८५ सालाचा, [ब] वांद्रे-कुर्ला समूह अधिसूचित क्षेत्राचा १९८४-८५ सालाचा [क] बॅक-बे रिक्लेमेशन क्षेत्रातील ब्लॉक ३ ते ६ यांचा १९८३-८४ व १९८४-८५ सालाचा आणि [ड] ओशिवरे जिल्हा केंद्राचा १९८२-८३, १९८३-८४ व १९८४-८५ या सालाचे वार्षिक कार्य-अहवाल याना प्राधिकरण आपली मान्यता देत आहे आणि उक्त अधिनियमांतील संबध्द तरतुदीखाली आवश्यक असल्याप्रमाणे ते अहवाल राज्य शासनाला सादर करण्याकरिता महानगर आयुक्ताना याद्वारे प्राधिकृत करीत आहे•"

शक्तीचे प्रत्यायोजन :

प्राधिकरणापुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेल्या, सापेक्षत: इतर कमी महत्वाच्या बाबींचा उल्लेख करून प्राधिकरणाने असे ठाम प्रतिपादन केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला अधिक प्रभावीपणे कार्यरत रहाणे शक्य व्हावे यासाठी वित्तीय, प्रशासकीय व इतर अधिकारांचे विविध स्तरांवर शक्तींचे प्रत्यायोजन केले जाणे गरजेचे आहे त्या दृष्टीने कार्यकारी समिती आणि महानगर

आयुक्त याना शक्ती प्रत्यायोजन करण्याची तरतूद असलेली एक सुयोग्य योजना प्राधिकरणापुढे मान्यतेसाठी ठेवली जावी, असा निर्णय घेण्यात आला. महानगर आयुक्ताना, त्याना प्रदान असणारे काही अधिकार, त्यापुढे प्राधिकरणाच्या इतर अधिका-याना प्रत्यायोजित करण्याचे अधिकार देण्याची तरतूदही सदर योजनेत समाविष्ट केली जावी असाही निर्णय घेण्यात आला.

अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

=========

457

# MINUTES OF THE FORTIETH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 27th March, 1986 (Thursday)

TIME : 12.00 (Noon).

PLACE : Committee Room, 6th Floor, Mantralaya, Bombay.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Dr. V. Subramanian, Minister for Urban Development & Housing. | - Chairman |
| Shri Vilas V. Sawant, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri Chhagan C. Bhujbal, Mayor of Bombay. | - Member |
| Shri R.C. Ankleshwaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Ramesh Dube, M.L.A. | - Member |
| Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - Member |
| Shri Pandurang S. Deshmukh, M.L.C. | - Member |
| Shri J.G. Kanga, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri D.K. Afzulpurkar, Secretary to Government, Housing and Special Assistance Department. | - Member |
| Shri L.C. Gupta, Managing Director, C.I.D.C.O. | - Member |
| Shri S.R. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary. |

Item No. 1 : Confirmation of the minutes of the last (39th) Meeting.

Secretary, Housing and Special Assistance Department referred to minutes in respect of Item No.9 and suggested that stringent measures should be prescribed in order to

ensure.....

ensure that once the Truck Terminal is put into operation, the transport companies, etc. would not also operate from their existing premises in South Bombay. He also emphasised the need of having an implementing authority in this respect.

1.2. Metropolitan Commissioner clarified that a draft legislation on the subject had already been prepared by BMRDA taking into consideration all possible aspects including the need to ensure that the transport operators, etc. will discontinue their operations from their existing places in South Bombay after the Truck Terminal becomes operational. This draft legislation was duly considered and approved by the Executive Committee, of which Secretary, Housing and Special Assistance Department is also a member, in its meeting held on 28th May, 1985 and thereafter sent to Law and Judiciary Department for final setting and clearance. Discussions were also held between BMRDA and Law and Judiciary Department on the draft bill and the final clearance of the Law Secretary is expected any time now..

1.3. After further discussion it was agreed that the draft bill may be shown to Secretary, Housing and Special Assistance Department for his suggestions, if any and after Law Secretary's approval it should be placed before the Authority.

1.4. The minutes were then confirmed.

Item No. 2 : Action taken on the minutes of the last (39th) Meeting.

Action taken report was noted by the Authority.

Item No. 3 : Disposal of Commercial Plots Nos.C-18 to C-22 in 'E' Block of Bandra-Kurla Complex.

3.1. There was elaborate discussion on this item in the course of which various suggestions and ideas were put forth and considered in detail.

3.2. At the outset the Metropolitan Commissioner pointed out that while various Public Sector Undertakings, Banks, etc. had registered their demand for plots in Bandra-Kurla Complex, it was also necessary to take into account the financial capacity of these

organisations.....

organisations to purchase the plots, if offered. This was necessary because in the past some organisations were not able to purchase the plots offered to them due to resource constraint, etc.

3.3. As regards the proposed price of Rs.4550/- per FSI sq. meter the Metropolitan Commissioner clarified that it was based on the highest offer received by MHADA in response to public auction of a similar plot in Bandra-Kurla Complex about 8 months back.

3.4. In the course of discussion, a suggestion was made that rather than disposing of the plots at the rate of Rs.4550/- per FSI sq. meter as proposed, the plots may be put to public auction. This suggestion, however, did not find favour as it was feared that Government Departments and Public Sector Undertakings who have registered their demand for plots were unlikely to come forward to bid in open auction and hence their demand for plots in BKC would remain unsatisfied. It was, therefore, felt that it would be quite appropriate to offer plots to public sector undertakings at a fixed price.

3.5. Some members felt that while disposing of plots in Bandra-Kurla Complex, BMRDA's overall objective of bringing about decongestion in South Bombay should be kept in mind. In this context it was suggested that plots should preferably be allotted to those organisations who are desirous of shifting their offices outside the Island City. The Metropolitan Commissioner stated that the main purpose in developing Bandra-Kurla Complex as a new Growth Centre was indeed to create an alternative infrastructural facility outside the Island City for accommodating office, residential and commercial activity. By creating large scale alternative office accommodation in Bandra-Kurla Complex, the mounting pressure for additional office space in the Island City will automatically be relieved and to that extent further congestion in the Island City will be arrested. He further stated that many organisations who had registered for plots in BKC would in fact divert part of their jobs to BKC once their offices are established there -Existing Offices/Premises of many of these organisations in South Bombay were at present extremely congested and if they were given

alternative space in BKC they would redeploy some of their existing employees to their new location in BKC, thereby decongesting South Bombay to some extent. Some Members felt that it would be quite unrealistic to expect the organisations to wholesale shift their existing offices from the Island City to BKC even if office plots were given to them in Bandra-Kurla Complex.

3.6. After further discussion on this item it was decided that information on the following points should be collected from the organisations who had registered their demand for commercial plots in BKC and placed before the Authority in order to enable it to take a considered decision on the proposal contained in the agenda item :

(i) Total area of the existing office premises in South Bombay occupied by the organisation.

(ii) The location (address) of the existing office premises in South Bombay.

(iii) Total number of employees working in these office premises.

(iv) The purpose for which the organisation requires commercial plot in BKC, viz.

<u>Whether</u> : (a) For expansion of existing activities/personnel.

<u>or</u> (b) For redeployment/shifting of part of its activities/department/employees from existing premises in South Bombay to proposed new premises in BKC (details of number of employees to be shifted to be furnished).

(c) For shifting of entire office activities including employees from South Bombay to proposed new premises in BKC.

(d) If (b) or (c) above is correct, to what use will the partially/fully vacated premises be put ?

3.7. The Authority also discussed the question whether the organisation to whom plots in BKC may be finally allotted should be given the option to quote a lower rate in case they show willingness to surrender one-tenth of built up space to Government at a rent to be decided by the Public Works Department. It was felt that such organisations should be asked to surrender one-tenth of built up space only if it is surplus to

their.....

their own requirements and that the rent should be reasonable market rent. It was decided that a provision incorporating this condition should be included in the lease agreement to be entered into between BMRDA and the allottee of the plot.

3.8. Decision on this item was deferred pending furnishing of information on points mentioned in para.3.6 above.

Item No. 4 : Amendment to BMRDA Truck Terminal Immovable Property Committee (Constitution, Powers and Functions) Regulations, 1986.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.300 :

"Resolved that in exercise of the powers conferred by sub-section (1) of Section 9 read with Section 50 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the BMRDA hereby amends as follows the BMRDA Truck Terminal Immovable Property Committee (Constitution, Powers and Functions) Regulations, 1986, approved by it under its Resolution No.293, in its 39th meeting held on 2nd January, 1986 :-

> 'In Regulation 5 of the BMRDA Truck Terminal Immovable Property Committee (Constitution, Powers and Functions) Regulations, 1986, after the words and letters "shall be substituted" the following words and letters shall be added :
>
> 'PROVIDED THAT clause (i) and (iii) of Regulation 9 of the BMRDA (Disposal of Land) Regulations, 1977, shall not apply and shall be excluded and that it shall be lawful for the Committee to determine the terms of payment of the premium and PROVIDED FURTHER that for the word "Authority" occuring in the said Regulations the word "Committee" shall be substituted'."

Item No. 5 : Annual Works Programme for 1986-87.

5.1. The Authority considered the Item Note. The Authority also noted that Government grant which was assumed at Rs.4/- crores initially was subsequently reduced to Rs.3.50 crores only as communicated by Government.

The.....

The Authority, therefore, agreed to the proposed reduction in the estimates of expenditure under Task No.7.6, "Channelisation of Mahim Creek", (Page 35 and 35-A of the Annual Works Programme 1986-87) from Rs.1/- crore to Rs.50/- lakhs.

5.2. During the course of discussion on this item, it was observed that while Section 18(1)(a) of the BMRDA Act, 1974 lays down that State Government's annual contribution to BMRDA shall not be less than Rs.5/- crores, in actual practice Government had given a total grant of about Rs.11.5 crores only in eleven years out of which Rs.4/- crores had been diverted to CIDCO for Kalwa-Turbhe Goods Siding. The Authority strongly felt that adequate grants as prescribed in the BMRDA Act, 1974 ought to be actually given to BMRDA in order to enable it to play an effective role.

5.3. The Authority then passed the following Resolution :

RESOLUTION NO.301 :

"Resolved that (a) the Annual Works Programme for the year 1986-87 presented with the Item Note be and is hereby approved subject to the modifications that estimates of expenditure under Task No.7.6 'Channelisation of Mahim Creek' being adopted at Rs.50/- lakhs as against Rs.1/- crore; and (b) the Executive Committee be and is hereby authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Works Programme."

Item No. 6 : Budget Estimates for 1986-87.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.302 :

"Resolved that the Annual Budget Estimates for the year 1986-87 and the Revised Estimates 1985-86 showing the estimated receipts and expenditures of the Metropolitan Authority be and are hereby approved under Section 23(1) of the BMRDA Act, 1974, subject to the following modifications being made therein :

> 'That a provision of Rs.3.50 crores (instead of Rs.4/- crores) be adopted as statutory contribution from State Government on the

Receipt Side of Budget Estimates 1986-87 and the total receipts be accordingly adopted at Rs.1,777.99 lakhs as against Rs.1,827.99 lakhs, and consequently, the expenditure on Development Works be adopted as Rs.1058.00 lakhs (instead of Rs.1108.00 lakhs) and the total expenditure adopted at Rs.1,777.99 lakhs (as against Rs.1,827.99 lakhs), the reduction being made under Task No.6 - "Channelisation of Mahim Creek as indicated in Item No.5'."

"Resolved further that the Authority do hereby authorise the Metropolitan Commissioner to incur expenditure in respect of Plan Grants to be received from the State Government under Section 18(1)(a) of the Act to the extent of amount released by the State Government as approved and subject to the conditions attached in the sanction of the Government.

"Resolved further that the Authority do hereby authorise the Executive Committee to sanction schemes/ surveys etc. not included in the Works Programme, estimated to cost not more than Rs.10/- lakhs in each case and to authorise the incurring of any expenditure not exceeding the same limit in respect of which provision has not been made in the approved budget, subject to the report of such cases being made to the Authority at the next meeting."

Item No. 7 : Minor Modification to the Development Plan of Kalyan under M.R. & T.P. Act, 1966 - Site No.62.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.303 :

"Whereas BMRDA is appointed Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area as per Government Resolution No.TPB/1275/1191/UD-8, dated 15th March, 1976, under the provisions of Section 40(1)(c) of MR&TP Act, 1966 and whereas it is obligatory on BMRDA to perform the functions of Planning Authority under the provisions of Section 113(8) of MR&TP Act, 1966;

"And whereas the area of the erstwhile Municipal Councils for Kalyan, Dombivali, Ambernath and Municipal limits of Ulhasnagar are included within the jurisdiction of Special Planning Authority;

"And .....

"And whereas the Kalyan Municipal Corporation has requested BMRDA to modify the reservation of Site No.62 from 'playground' to 'school and playground' and the appropriate Authority for the acquisition and development of Site No.62 from 'Municipal Council of Kalyan' to 'Shishu Vikas Sanstha', Kalyan;

"And whereas the Government of Maharashtra has directed BMRDA to **initiate** modifications to the sanctioned Development Plan of Kalyan in respect of Site No.62, under the provisions of Section 37 of MR&TP Act, 1966;

"Now, therefore, in exercise of the powers contained in Section 113(8) of MR&TP Act, 1966, BMRDA resolves to initiate minor modifications to the sanctioned Development Plan of Kalyan as indicated in Section 37 of MR&TP Act in respect of Site No.62.

"Resolved further that the Authority do in exercise of powers under Section 37 of the said Act and other powers enabling it in this behalf, approve of a notice being published in the Maharashtra Government Gazette and in not less than two local newspapers inviting objections and suggestions from the public with respect to such modification not later than one month from the date of such notice.

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act, read with Section 7(A) of the BMRDA Act, 1974 authorises the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses.

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf, after giving hearing to persons presenting such objections/suggestions and shall submit his report to the State Government alongwith proposed modifications for final sanction in terms of Section 37 of the said Act."

Item No. 8 : .....

Item No. 8 : MR&TP Act, 1966.
Standardised Building Regulations and Development Control Rules -- Adoption in respect of -- Kalyan Municipal Corporation and Ulhasnagar Municipal Council areas.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.304 :

"Resolved that, in view of enabling powers under Section 40(1)(3) and 113(8) of MR&TP Act, 1966 read with Section 12(3) of the BMRDA Act, 1974 and all other powers in that behalf, the Standardised Building Regulations and Development Control Rules as approved by Government vide its Resolution dated 16-7-1980 for municipal corporation areas in the State, as slightly modified to suit the local area, shall be made applicable to the entire area of the Kalyan Complex Notified Area including the area under the jurisdiction of the erstwhile Municipal Councils of Kalyan, Dombivali and Ambernath and the area under jurisdiction of Ulhasnagar Municipal Council.

"Resolved further that the new set of Rules/ Regulations are herewith adopted and shall be brought into force with immediate effect as directed by Government under Section 154 of MR&TP Act, 1966.

"Resolved further that the Metropolitan Commissioner is authorised to take further necessary action, as required under Section 37 of the MR&TP Act, 1966, in the matter."

Item No. 9 : Continuance of the post of Project Officer (Marketing).

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.305 :

"Resolved that the Authority hereby approves the continuance of the post of Project Officer (Marketing) in the pay-scale of Rs.1000-50-1750 plus usual allowances for a further period of two years ending on 31st March, 1988, as proposed."

Item No.10 : .....

Item No.10 : Creation of four posts of 'Trainees'.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.306 :

"Resolved that in exercise of the powers vested in it under Section 11(2) of the BMRDA Act, 1974, the Authority hereby accords sanction to the creation of four posts of 'Trainee'; two each in the Administration Division and the Finance and Accounts Division; on a fixed rate of stipend as may be determined by Government from time to time, as proposed in the Item Note."

Item No.11 : Revision of Washing Allowance Rates.

The Authority considered the Item Note, and decided that the rate of Washing Allowance to the Peons, Watchmen and Drivers be revised to Rs.20/- per month instead of Rs.15/- as suggested in the Item Note. Accordingly, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.307 :

"Resolved that the Authority hereby accords its sanction to the Peons, Watchmen and Drivers of the BMRDA being paid Washing Allowance at a uniform rate of Rs.20/- per month from the official year 1986-87."

Item No.12 : (a) Annual Report of the BMRDA as a Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area of the year 1984-85.

(b) Annual Report by the BMRDA as a Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1984-85.

(c) Annual Report of Special Planning Authority for BBRS for the year 1983-84 and 1984-85.

(d) Annual Report by BMRDA as a Special Planning Authority for Oshiware District Centre for the year -
i) 18.06.1982 to 31.03.1983.
ii) 01.04.1983 to 31.03.1984.
iii) 01.04.1984 to 31.03.1985.

The Authority considered the Annual Reports of the BMRDA as a Special Planning Authority for various notified

areas.....

467

areas as stated above and passed the following Resolution :

RESOLUTION NO.308 :

"Resolved that as required under Section 133 of the M.R. & T.P. Act, 1966 the Authority hereby approves drafts of the Annual Reports of the BMRDA as Special Planning Authority for - (a) Kalyan Complex Notified Area for the year 1984-85; (b) Bandra-Kurla Notified Area for the year 1984-85; (c) Blocks III to VI of Backbay Reclamation Area for the years 1983-84 and 1984-85; and (d) Oshiware District Centre for the years 1982-83, 1983-84 and 1984-85 and authorise the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government as required under the Act."

Delegation of Powers :

Referring to some of the relatively less important items which were referred to the Authority for approval, the Authority strongly felt that there is need to have proper delegation of financial, administrative and other powers at various levels in order to enable BMRDA to be functionally more effective. It was decided that a proper scheme of delegation of powers to the Executive Committee and the Metropolitan Commissioner should be formulated and placed before the Authority for approval. It was further decided that a provision should also be included in the scheme for empowering Metropolitan Commissioner to in turn delegate some powers to other officers of BMRDA.

The meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

$$$$$$$$$$$$$$$$

ukd:28486: